**नि.दिवाणी दावा क. ३२/२०१८**
अरूण + ३ वि. श्रीमती विमलाबाई

## आदेश निशाणी ०५ खालील
{पारीत दिनांक ०१/१०/२०१८}

१) प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे प्रतिवादी याचे विरूध्द तुर्तातूर्त ताकीदीचा मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी तर्फे म्हणणे (नि.१४) देवून अर्जास विरोध दर्शविण्यात आला.

२) वादी यांचे अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादी १ ते ४ हे दानापूर, ता. तेल्हारा, जि. अकोला येथील रहीवाशी असून ते मयत शालीग्राम संपत लहासे यांचे मुले आहेत त्यांचे वडिलांचे नांवे दानापूर शिवारात गट नंबर ५४७ क्षेत्र १ हेक्टर ४१ आर आकार ८. ९१ पैसे अशी शेतजमीन असून सदर शेत जमीन शालीग्राम संपत लहासे यांनी १९८७ चे रजिस्टर्ड खरेदीखता द्वारे प्रतिवादीचे वडिल शामराव ठाकरे यांचे जवळून विकत घेतलेली आहे. वादी यांनी दाव्या सोबत समजूतीचा नकाशा दिलेला असून त्यामध्ये प्रतिवादी यांचा पूर्वीचा वहीवाटीचा रस्ता हा दानापूर राईखेड रस्त्याने येवून भोगळ व ढाकरे यांचे शेतातून प्रतिवादीचे शेतापर्यंत असून त्या रस्त्याने सुध्दा प्रतिवादीला वहीती करता येते असे दर्शविलेले आहे.

३) पुढे अर्जातील कथन असे की, अशी परिस्थितीती असताना प्रतिवादीने वादीचे मयत वडिल यांचे विरूध्द तहसीलदार, तेल्हारा यांचे न्यायालयात महसूल प्रकरण कं. एलएनडी/१० दानापूर/ /२०१६-१७ या प्रकरणा द्वारे अर्ज दाखल करून पश्चिम धु-यावरून १० फुटाचे रस्त्याची मागणी केली व विद्यमान तहसीलदार साहेब, तेल्हारा यांनी वादी कं. १ व २ यांना कोणतही प्रकारची लेखी सूचना न देता केवळ प्रतिवादीचे सांगण्यावरून स्थळ निरीक्षण करून वादीचे

शेतातून पश्चिम धु-यावरून प्रतिवादी हिला रस्ता देण्यात यावा असा आदेश पारित केलेला आहे. सदरचा आदेश हा तहसीलदार यांनी मूळ वस्तूस्थितीकडे दूर्लक्ष करून व कायदेशीर तरतूदीचे योग्य पालन न करता केलेला आहे. मूळतः प्रतिवादी हिने तहसीलदार यांचे न्यायालयावर मामलतदार कोर्ट ॲक्ट कलम ५ प्रमाणे या प्रकरणाचे आधी ढाकरे व भोगळ यांचे विरूध्द प्रकरण दाखल केले होते ते प्रकरण तहसीलदार यांनी खारीज केलेले होते या बाबीचा तहसीलदार यांनी न्यायनिर्णय देतांना विचार केलेला नाही.

४) वादी पुढे असे कथन करतो की, सदर आदेशाचा गैरफायदा घेवून वादीचे पश्चिम धु-याचे आतून वादीचे मालकीचे शेतातून प्रतिवादी नवीन वहीवाट पाडून रस्ता तयार करण्याचे तयारीत आहे व यामध्ये ती यशस्वी झाली तर वादीचे कशानेही न भरून येणारे नुकसान होईल. तसेच वादीचे शेतातून बेकायदेशीर वहीवाट नवीन रित्या सुरू होईल ज्यामुळे वादीचे अपरिमीत नुकसान होवून त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी विरूध्द मनाईहुकूम द्यावा अशी वादी यांनी विनंती केलेली आहे.

५) तर याकामी प्रतिवादी तर्फे म्हणणे असे कथन केले आहे की, श्री. शालीग्राम संपत लहासे यांनी प्रतिवादीचे वडिलांसोबत असलेल्या सलोख्याच्या संबंधाचा चुकीचा फायदा घेवून आणि प्रतिवादीचे वडिल हे म्हातारे असल्यामुळे त्याबाबीचा फायदा घेवून स्वताःचे फायदेकरीता, त्यांनी प्रतिवादींचे वडिलांकडून दिशाभूल करून सदर दावा शेताबाबत कागदपत्रे तयार केले होते. तसेच प्रतिवादी यांनी दावा शेतीबाबत प्रतिवादीचे वडिलांनी सन १९८७ मध्ये नोंदणीकृत खरेदीखत करून घेतले ही बाब देखील प्रतिवादी यांनी नाकारलेली आहे.

६) प्रतिवादी पुढे असे कथन करते की, प्रतिवादी हिचा विवाह झाल्यामुळे तिला तिचे शेत अस्तित्वात असले बाबत माहिती नव्हती आणि यासंदर्भात

माहीती झाले नंतर तिने तहसीलदार यांचेकडे महाराष्ट् महसूल कायदा १९६६ चे कलम १४३ नुसार अर्ज केलेला आहे व त्यावर त्यांनी आदेश पारीत केलेला आहे. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादीने परिच्छेद क्रं. ३ मध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी तिच्या वडिलांच्या हयातीच्या काळापासून तिचे असलेल्या शेता करता गट नंबर ५४८ जे शालीग्राम लहासे यांचे नांवाने होते त्या शेतामधून पश्चिमेकडील धु-याच्या आतून दक्षिणेउत्तर असा जो रस्ता वापरात वहीवाटीचे अधिकारानुसार होता त्याला अडथळा निर्माण झालेवरूनच प्रतिवादी हिने सदरचा अर्ज रितसर दाखल केला होता.

७) प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, जर वादीच्या पक्षात मनाईहुकूम मिळाला तर प्रतिवादी हिला तिचे शेत जमीनीची वहीती करता येणार नाही व तिची अपरिमीत हानी होईल म्हणून वादी यांचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

८) वादी व प्रतिवादी यांचे परस्परविरोधी कथनांतून खालील मुददे माझे विचारार्थ उपस्थित झाले असुन त्यांचे निष्कर्ष कारणांसह खालील प्रमाणे.

| **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. वादी त्यांना सकृतदर्शनी बाजू असल्याचे सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| २. वादी त्यांना सोयीचा समतोल हा त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| ३. वादी त्यांना मनाई हुकूम न मिळाल्यास त्यांची अपरिमित हानी होईल हे सिध्द करतात काय ? | होकारार्थी. |
| ४. काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## : कारणमिमांसा :

### मुद्दे क्र.१ ते ३ बाबत एकत्रीतपणे :-

९) प्रस्तुतकामी वादींतर्फे विधिज्ञ श्री. ए. एस. सेंगर व प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. एम.एस. राठी यांचा युक्तिवाद ऐकला. वादी व प्रतिवादी तर्फे अभिलेखावर दाखल करण्यात आलेले कागदपत्रांचे अवलोकन केले.

१०) वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचे विरूध्द जाहीर हुकूम व मनाई मिळण्यासाठी दाखल केलेला असून वादी तर्फे असे युक्तिवाद करण्यात आला की, वादी १ ते ४ हे दानापूर, ता. तेल्हारा, जि. अकोला येथील रहीवाशी असून ते मयत शालीग्राम संपत लहासे यांचे मुले आहेत त्यांचे वडिलांचे नांवे दानापूर शिवारात गट नंबर ५४७ क्षेत्र १ हेक्टर ४१ आर आकार ८.९१ पैसे अशी शेतजमीन असून सदर शेत जमीन शालीग्राम संपत लहासे यांनी १९८७ चे रजिस्टर्ड खरेदीखता द्वारे प्रतिवादीचे वडिल शामराव ठाकरे यांचे जवळून विकत घेतलेली आहे. वादी यांनी दाव्या सोबत समजूतीचा नकाशा दिलेला असून असे युक्तिवाद केला की, प्रतिवादी यांचा पूर्वीचा वहीवाटीचा रस्ता हा दानापूर राईखेड रस्त्याने येवून भोगळ व ढाकरे यांचे शेतातून प्रतिवादीचे शेतापर्यंत असून त्या रस्त्याने सुध्दा प्रतिवादीला वहीती करता येते.

११) असे असताना प्रतिवादीने वादीचे मयत वडिल यांचे विरूध्द तहसीलदार, तेल्हारा यांचे न्यायालयात महसूल प्रकरण क्रं. एलएनडी/१० दानापूर/ /२०१६-१७ या प्रकरणा द्वारे अर्ज दाखल करून पश्चिम धु-यावरून १० फुटाचे रस्त्याची मागणी केली व विद्यमान तहसीलदार साहेब, तेल्हारा यांनी वादी क्रं. १ व २ यांना कोणतही प्रकारची लेखी सूचना न देता केवळ प्रतिवादीचे सांगण्यावरून स्थळ निरीक्षण करून वादीचे शेतातून पश्चिम धु-यावरून प्रतिवादी हिला रस्ता देण्यात यावा असा आदेश पारित केलेला आहे.

सदरचा आदेश हा तहसीलदार यांनी मूळ वस्तूस्थितीकडे दूर्लक्ष करून व कायदेशीर तरतूदीचे योग्य पालन न करता केलेला आहे. मूळतः प्रतिवादी हिने तहसीलदार यांचे न्यायालयावर मामलतदार कोर्ट ॲक्ट कलम ५ प्रमाणे या प्रकरणाचे आधी ढाकरे व भोगळ यांचे विरूध्द प्रकरण दाखल केले होते ते प्रकरण तहसीलदार यांनी खारीज केलेले होते या बाबीचा तहसीलदार यांनी न्यायनिर्णय देतांना विचार केलेला नाही. वादी तर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला सदर आदेशाचा गैरफायदा घेवून वादीचे पश्चिम धु–याचे आतून वादीचे मालकीचे शेतातून प्रतिवादी नवीन वहीवाट पाडून रस्ता तयार करण्याचे तयारीत आहे व यामध्ये ती यशस्वी झाली तर वादीचे कशानेही न भरून येणारे नुकसान होईल. तसेच वादीचे शेतातून बेकायदेशीर वहीवाट नवीन रित्या सुरू होईल ज्यामुळे वादीचे अपरिमीत नुकसान होवून त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी विरूध्द मनाईहुकूम द्यावा अशी वादी यांनी विनंती केलेली आहे.

१२) तर याकामी प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, श्री. शालीग्राम संपत लहासे यांनी प्रतिवादीचे वडिलांसोबत असलेल्या सलोख्याच्या संबंधाचा चुकीचा फायदा घेवून आणि प्रतिवादीचे वडिल हे म्हातारे असल्यामुळे त्याबाबीचा फायदा घेवून स्वताःचे फायदेकरीता त्यांनी प्रतिवादींचे वडिलांकडून दिशाभूल करून सदर दावा शेताबाबत कागदपत्रे तयार केले होते. तसेच प्रतिवादी यांनी दावा शेतीबाबत प्रतिवादीचे वडिलांनी सन १९८७ मध्ये नोंदणीकृत खरेदीखत करून घेतले ही बाब देखील प्रतिवादी यांनी नाकारलेली आहे. प्रतिवादी यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, प्रतिवादी हिचा विवाह झाल्यामुळे तिला तिचे शेत अस्तित्वात असले बाबत माहिती नव्हती आणि यासंदर्भात माहीती झाले नंतर तिने तहसीलदार यांचेकडे महाराष्ट्र महसूल कायदा १९६६ चे कलम १४३ नुसार अर्ज केलेला आहे व त्यावर त्यांनी आदेश पारीत केलेला आहे. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादीने परिच्छिेद क्रं. ३ मध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी तिच्या वडिलांच्या हयातीच्या

काळापासून तिचे असलेल्या शेता करता गट नंबर ५४८ जे शालीग्राम लहासे यांचे नांवाने होते त्याशेतामधून पश्चिमेकडील धु-याच्या आतून दक्षिणेउत्तर असा जो रस्ता वापरात वहीवाटीचे अधिकारानुसार होता त्याला अडथळा निर्माण झालेवरूनच प्रतिवादी हिने सदरचा अर्ज रितसर दाखल केला होता.

१३) याठिकाणी वादी तर्फे विधीज्ञ यांनी माझे लक्ष कागदयादी नि.क्रं. ४ ने अनुक्रमांक ३ ने लगत दाखल तहसीलदार यांचे दिनांक ०५.१२.२०१७ रोजीचे निकालपत्राकडे वेधले. सदरचे निकालातील मुद्दा क्रं. ४ पाहता त्यामध्ये तहसीलदार यांनी स्पष्टपणे असे नमूद केले आहे की,

"अर्जदार यांचे शेत जमीन आज रोजी पडीत असल्याचे अढळले व वहीवाटीचा कोणताही शेत रस्ता वाद क्षेत्राला आढळून आला नाही. अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमूद केल्याप्रमाणे दानापूर, तेल्हारा सडकेने आल्यानंतर गैरअर्जदार यांचे शेतात पश्चिम सिमेच्या आतून अर्जदार यांचे शेतावरचे अंतर हे पूर्व सीमेच्या आतून असलेल्या क्षेत्रापेक्षा कमी आहे **त्यामुळे गैरअर्जदार यांचे शतातून शेत रस्ता देणे झाल्यास त्यांचे ताब्यातील क्षेत्राचे पश्चिम सिमेच्या आतून शेत रस्ता देता येवू शकतो"**

१४) पुढे तहसीलदार यांनी आदेशामध्ये कलम २ मध्ये असे नमूद केले आहे की,

(२) "अर्जदार यांना मौजे दानापूर, ता. तेल्हारा, जि. अकोला येथील शेत गट नंबर ५४८ क्षेत्र १.१४ हेक्टर आर क्षेत्रा पैकी गैरअर्जदार यांचे शेताचे उत्तरेला असलेल्या त्यांच्या शेतजमीनीची वहीती करण्याकरीता दानापूर, तेल्हारा डाबरी सडकेने आल्यावर, गैरअर्जदार यांचे गट नंबर ५४८ क्षेत्र १.४१ हेक्टर आर च्या **पश्चिम सिमेवरून** दक्षिण उत्तर शेत रस्ता त्यांचे शेताचे दक्षिण पश्चिम सिमेपर्यंत मंजूर करण्यात येत आहे."

१५) याठिकाणी उपरोक्त मजकूराकडे माझे लक्ष वेधून वादीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, वास्तविक पाहता तहसीलदार यांनी आदेश मुद्दा क्रं. २ मध्ये गट नंबर ५४८ चे पश्चिम सिमेवरून दक्षिण उत्तर असा शेत रस्ता मंजूर केलेला आहे परंतू, मुद्दा क्रं. ४ मध्ये उपरोक्त नमूद केले प्रमाणे वादीचे ताब्यात असलेल्या क्षेत्राचे पश्चिम सिमेच्या आतून शेत रस्ता देता येवू शकतो असे नमूद केलेले आहे व त्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी कफीयत कलम ३ मध्ये असा वहीवाटीचा रस्ता असलेचे कथन घेवून आलेल्या अशा परिस्थितीत वादीची सदरचे रस्त्यामुळे शेतातून वहीवाट चालू झाल्यास अपरिमीत हानी होईल यावादी यांचे युक्तिवादाशी मी सहमत आहे.

१६) तहसीलदार यांनी निकालपत्रामध्ये केलेले संदिग्ध कथन पाहता तसेच प्रतिवादी ही वादी यांचे सन १९८९ साली झालेले खरेदीपत्राची बाब नाकारत आहे ही बाब पाहता वादी यांना मनाईहुकूम न दिलेस व प्रतिवादी यांनी तहसीलदार यांचे आदेशास अनुसरून वहीवाट सुरू केलेस वादी यांची निश्चितच अपरिमीत हानी होईल हे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने मुद्दा क्रं. १ ते ३ बाबत नाकारार्थी निष्कर्ष देवून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. वादी यांचा ५ लगतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी हिने स्वत: अगर तिचे वतीने अन्य कोणीही वादीचे मालकीचे दाव्यात वर्णन केलेल्या व नकाशात दर्शविल्याप्रमाणे पश्चिमेकडील धु-याचे आतून कोणत्याही प्रकारे रस्त्याची वहीवाट करू नये असा आदेश देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च अंतीम निकालानुसार.

स्वा/-

दिनांक : ०१/१०/२०१८. ( अ.र. माळवदे )
तेल्हारा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, तेल्हारा

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per original order.

Name of Steno : R. C.Bajpai
Court Name : Civil Judge (Jr.Dn.), Telhara
Date : 01-10-2018
Signed by
Presiding Officer : 01-10-2018
Uploaded on : 01-10-2018